IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# भारतीय ज्ञान परंपरा आणि लोकसाहित्य

**डॉ. व्यंकट बाबूराव सूर्यवंशी**
सामाजिक विज्ञान एवं मानविकी शिक्षा विभाग
क्षेत्रीय शिक्षा संस्थान (एनसीईआरटी), भोपाळ, मध्यप्रदेश भारत
venkatsuryawanshi21@gmail.com

**सारांश** (Abstract) *भारतीय संस्कृती एक महान संस्कृती आहे. 'भारतीय ज्ञान परंपरा' समृद्ध आहे. भारतीय ज्ञान परंपरेत ज्ञान आणि विज्ञान, लौकिक आणि पारलौकिक, कर्म आणि धर्म आणि त्याग यांचा अद्भुत समन्वय आहे. प्राचीन वेद काळापासूनच भारतीय शिक्षणपद्धतीने जीवनातील नैतिक, भौतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. ग्रंथार्जनासोबतच शारीरिक श्रमांचे महत्त्व भारतीय ज्ञानपरंपरेतून अधोरेखित होते. भारतीय ज्ञान परंपरेचा पाया वेद, पुराणे, उपनिषदे, स्मृती, महाकाव्ये आणि धार्मिक तत्त्वज्ञानात्मक ग्रंथांमध्ये आहे. या परंपरेने समाजाला केवळ आध्यात्मिक ज्ञानाबरोबरच जीवन जगण्याचे मार्गदर्शनही केले. ही परंपरा हजारो वर्षांपासून मौखिक आणि लिखित स्वरूपात जतन केली आहे . आजही या परंपरेचा प्रभाव भारतीय संस्कृती आणि जीवनशैलीत स्पष्टपणे दिसतो. लोकसाहित्य हा भारतीय समाजाच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक जाणिवेचा एक भाग असून त्यातून लोकांची भाषा, विचार, भावना आणि अनुभव यांचा समावेश होतो. लोकसाहित्याचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याचे मौखिक स्वरूप, ज्यामुळे ते पिढ्यानपिढ्या हस्तांतरित होऊ शकते. यामध्ये लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, लोकनाट्ये इत्यादींचा समावेश होतो. हे केवळ मनोरंजनाचे माध्यम म्हणून काम करत नाही, तर सामाजिक आणि नैतिक मूल्यांचे जतन करते.*

*भारतीय ज्ञान परंपरेत हजारो वर्षांचा सांस्कृतिक, धार्मिक आणि वैज्ञानिक उपलब्धींचा एक विशाल संग्रह आहे. जो पिढ्यानपिढ्या हस्तांतरित होत आला आहे. वेद, पुराणे, उपनिषदे, महाकाव्ये आणि इतर ग्रंथांसोबतच, लोकसाहित्यानेही या परंपरेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. भारतीय समाजाची ज्ञान परंपरा जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे लोकसाहित्य हे एक प्रमुख माध्यम आहे. मौखिक परंपरा, लोकगीते, कथा, म्हणी आणि लोकनाट्यांच्या माध्यमातून सामाजिक, धार्मिक, नैतिक, वैज्ञानिक आणि तात्विक ज्ञानाचा प्रसार करते.*

*राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय ज्ञान परंपरेवर भर देण्यात आलेला आहे. सुसंस्कारासोबतच मातृभाषा आणि शारीरिक शिक्षणाचाही सांगोपांग विचार या नव्या शैक्षणिक धोरणात करण्यात आलेला आहे. प्राचीन काळी गुरूंना सर्वश्रेष्ठ समजले जात असे. नव्या धोरणातही सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविताना शिक्षकांकडूनही निस्वार्थी, त्यागी आणि सर्वज्ञानी असण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आलेली आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेचे जगभरात जे स्थान प्राचीन काळी होते. तेच परत मिळविण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण प्रयत्नशील आहे.*

**मुख्य शब्द:** भारतीय ज्ञान परंपरा, प्राचीन, सांस्कृतिक, महाकाव्ये, लोकसाहित्य, धार्मिक, वैज्ञानिक, वेद, पुराणे, उपनिषदे व समाज.

## I. प्रस्तावना

### भारतीय ज्ञान परंपरेची वैशिष्ट्ये

भारतीय ज्ञान प्रणाली ही एक समृद्ध आणि वैविध्यपूर्ण परंपरा आहे; ज्यामध्ये तत्त्वज्ञान, अध्यात्म, विज्ञान, कला आणि संस्कृती यासह विविध विषयांचा समावेश आहे. हा हजारो वर्षांचा मोठा इतिहास आहे आणि विविध संस्कृती आणि संस्कृतींच्या प्रभावाखाली कालांतराने तो विकसित झाला आहे. भारतीय ज्ञान परंपरा समजून घेण्यासाठी पुढील विचार करणे महत्त्वाचे ठरते.

### १) समग्र दृष्टिकोन

व्यक्ती, समाज आणि विश्वाचे सर्वसमावेशक आकलन देते. भारतीय ज्ञान परंपरांचा सर्वांगीण दृष्टिकोन जीवनातील शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक पैलूंना एकत्रित करतो. भारतीय ज्ञान परंपरांचा समग्र दृष्टिकोन आधुनिक समाजासाठी मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करतो. अधिक समावेशक, शाश्वत आणि संतुलित जीवनशैलीचा प्रचार करतो.

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

**२) बहुविद्याशाखीय**

भारतीय ज्ञानपरंपरेत विविध विषयांची विस्तृत श्रेणी समाविष्ट आहे. प्रामुख्याने तत्त्वज्ञान, अध्यात्म, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आयुर्वेद औषध, ज्योतिषखगोलशास्त्र, सामाजिक विज्ञान, गणित, भारतीय गणित, कला आणि सौंदर्यशास्त्र,नाट्य शास्त्र संगीत छंदा शिल्प भाषा आणि साहित्य, खगोलशास्त्र असे वैविध्यपूर्ण विषय भारतीय ज्ञानपरंपरेची व्यापकता दर्शवितात.

**३) प्राचीन विचारसरणी**

प्राचीन संस्कृती आणि संस्कृतींद्वारे जमा केलेले सामूहिक ज्ञान जे आज आपल्यापर्यंत पोहोचले. यात वेद, उपनिषद, आयुर्वेद, योग, ज्योतिष, गांधार, न्याय, वैशेषिक, मीमांसा, सांख्य, नाट्यशास्त्र, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, मनुस्मृती व मानवी अनुभवांच्या विविध पैलूंचा समावेश होतो.

**४) संदर्भित प्रासंगिकता**

शाश्वत विकास साधून उपाय योजना देण्यास सज्ज करून स्थानिक आणि जागतिक आव्हानांना वेष्टन घालणे.

**५) आध्यात्मिक वाढ**

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये, आध्यात्मिक वाढ (अध्यात्म विकास) म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या चेतनेची उत्क्रांती वाढवणे, ज्यामुळे आत्म-साक्षात्कार आणि अंतिम मुक्ती (मोक्ष) होते.

**६) सांस्कृतिक वारसा**

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये, सांस्कृतिक वारसा, सामूहिक विचारसरणी, परंपरा आणि प्रथा यांचा संदर्भ घेतात. राष्ट्रीय अस्मिता, एकता, सांस्कृतिक जागरूकता, विचारसरणी,, शिक्षण आणि संशोधनाला साहाय्य करणे, सर्जनशीलता आणि नवीनता वाढवणे व सांस्कृतिक सातत्य आणि उत्क्रांती सुनिश्चित करणे आदींचा समावेश आहे.

**७) जागतिक प्रभाव**

भारतीय ज्ञान परंपरेमुळे जागतिक ज्ञानात भर पडली. त्यात प्रामुख्याने गणित, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र तसेच तत्त्वज्ञानाला आकार देण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

**८) अनुकूलता**

भारतीय ज्ञान परंपरेने आपली मूळ तत्वे जपत नवीन कल्पनांचा अंतर्भाव करून काळाबरोबर विकसित ज्ञान आत्मसात केले व त्यातील नावीन्याचा स्वीकार करून स्वज्ञानात भर टाकून नावीन्यपूर्ण संशोधन केले व त्या नावीन्याचा प्रसार केला तसेच अंतर्मुख ज्ञानाची सांगड योग्य पद्धतीने जगासमोर आणली.

**९) सशक्तीकरण**

स्वावलंबन, गंभीर विचार आणि वैयक्तिक वाढीस प्रोत्साहन देते.

**१०) सार्वत्रिक आवाहन**

भारतीय ज्ञान प्रणालीने भौगोलिक सीमा ओलांडून, मानवतेसाठी अंतर्दृष्टी देऊन स्वज्ञान जगासमोर आणले व त्याचा प्रसार केला. प्राचीनकाळी भारतभूमी ही जागतिक ज्ञान केंद्र म्हणून उदयास आली त्यात तक्षशिला, नालंदा, मिथिला वलभी ही ज्ञानकेंद्रें होती. या सर्व वैशिष्ट्यांमुळे भारतीय ज्ञान परंपरा जगातील समृद्ध ज्ञान परंपरा म्हणून ओळखली जात होती.

भारतीय संस्कृती जगातील सर्वात प्राचीन आणि वैविध्यपूर्ण संस्कृतींपैकी एक मानली जाते. तिचा पाया ज्ञानावर आधारित आहे. मराठी लोकसाहित्य मौखिक परंपरेने पोहोचलेले दिसते. लोकरूढी, विधी समजूतीचा वारसा सांगणारी किंवा केवळ प्रयोगसिद्ध

कला, कथागीत, उखाणे, म्हणी म्हणजे लोकसाहित्याची व्याप्ती नव्हे तर जागर, गोंधळ, विवाह, बोहाडा, रामलीला, भवई, यांसारखे लोकनाटयाचे मंचीय प्रयोगरूप आविष्कार, रांगोळया, भिन्नभिन्नचित्रे, यांसारखे चित्राविष्कार, फुगडया, हमामा, विटी-दांडू यांसारखे खेळ, अंगारे-धुपारे, दृष्ट काढणे यांसारखे उपचार विधी, गृहबांधणी, भांडी, अवजारे तयार करण्याच्या पध्दती या सर्वांचा समावेश ज्यात होतो ते लोकसाहित्य. 'लोकसाहित्य ' आणि 'लोकजीवन ' याचा संबंध हा अनंन्यसाधारण असा आहे. तेव्हा लोकजीवनाचे वास्तव रूप समजून घ्यायचे असेल तर लोकसाहित्यासारखे दुसरे खात्रीशीर साधन नाही. कारण लोकसाहित्यात नैसर्गिकपणे कोणताही आडपडदा न ठेवता मानवी मनाचा आविष्कार झालेला असतो. हा आविष्कार भावनात्मक पातळीवर असला तरी त्यात प्रकट होणारे वास्तव असते. मानव समूह ज्या भाषेत व्यवहार करीत असतो. त्याच भाषेत त्याची निर्मिती होत असते. म्हणून लोकसाहित्याचा संबंध हा अनेक भाषांशी आलेला दिसतो आहे. लोकसाहित्य एका प्रदेशापुरते मर्यादित न राहता त्याचा विस्तार हा जगभर होत राहतो.

एखाद्या प्रदेशाचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, भौगोलिक, आर्थिक, इतिहास अभ्यासायचा असेल तर लोकसाहित्याची मदत घ्यावी लागते. म्हणून इतिहास समजून घेण्यासाठी लोकसाहित्य उपयोगी ठरते. त्यातून केवळ इतिहासाचीच नव्हे, तर लोकमानसाची वैशिष्ट्येही उघड होतात. यावरून आपल्याला लोकसाहित्याचे क्षेत्र विशाल दिसते.

### लोकगीतांमधील लोककथा

आपल्या समाजातील प्रत्येक सण, विवाह, शेती आणि दैनंदिन जीवनाशी संबंधित गीतांमध्ये पारंपरिक धार्मिक प्रतीके सहजपणे गीताच्या माध्यमातून आपल्याला कथाकथन ऐकायला मिळते. लोकगीतामध्ये अभंग, पोवाडा, लावणी, भावगीते, भारूड, दिंडी गीते, लग्नगीते, नागपंचमीची गाणी, गौराई गाणी, भोंडला, कीर्तन, ललित ,तमाशा, पोवाडा, दशावतार, गोंधळ, लंगर विधी, जात्यावरील गाणी, वासुदेव, भारूड, बहुरूपी, गजगीते, वाक्प्रचार, म्हणी, उखाणे इ.

### लोककथा

प्राचीन काळापासून 'कथा' हा प्रकार विविध स्वरूपांत चालत आलेला दिसतो. ऋग्वेदातील यम-यमीसारख्या कथा, महाभारताच्या कर्णपर्वातील हंसकाकीय आख्यान, सुबुन्धुची वासवदत्ता, बाणभट्टाची कादंबरी, दण्डीचे दशकुमारचरित, बौध्द वाङ्मयातील अनेक जातक कथा, प्राचीन साहित्यातील बृहत्कथासार, कथाकल्पद्रुम, इसापनीती, वेताळ पंचविशी, शुकसप्तमी हे सारे साहित्य प्राचीन काळातील कथावाङ्मयाची विविधता दर्शवतात. पंचतंत्र, हितोपदेश, वेताळ पंचविशी, आणि जातक कथांमध्ये नैतिक आणि व्यावहारिक ज्ञानाचा संग्रह आढळतो. तेराव्या शतकातील महानुभाव साहित्यात 'दृष्टांतपाठ' या चक्रधरांनी सांगितलेल्या पाठातील अनेक दृष्टांत म्हणजे लघुत्तम कथाच होत. पंडितकवी आणि शाहिरांनी निर्माण केलेले आख्यान वाड्मय यामुळे कथावाङ्मय समृद्ध झाले.

### लोकनाट्य हे कथाकथन

नाट्य आणि दृश्यात्मक सादरीकरणाद्वारे मनोरंजन आणि ज्ञानाचा संगम साधते. भारूड, लोकनाट्य, लोककथा, लोकनृत्ये यातून ज्ञान परंपरेच्या माध्यमातून ज्ञान आपल्याला मिळते.

### औषधी ज्ञान व आयुर्वेदिक वनस्पती

पारंपरिक औषधे आणि घरगुती उपायांना प्रोत्साहन देण्यासाठी लोकपरंपरांचा माध्यम म्हणून वापर केला गेला.

मराठी भाषेच्या लोकसाहित्याबद्दल आपल्या लोक आणि अभिजात या ग्रंथात अरूणा ढेरे आपले मत नोंदविताना म्हणतात, "लोकसंस्कृती आणि अभिजात संस्कृती यांच्या नात्याचं अस्तित्व सिद्ध करण्याची आता गरज नाही. मानवजातीच्या आजवरच्या जीवनप्रवाहात या दोहोंची मिसळण होतच आली आहे. त्या मिसळणीचा, तिच्या परिणामांचा शोध कधी धर्मेतिहासज्ञांनी, कधी समाजमानसशास्त्रज्ञांनी, तर कधी लोकविद्येच्या अभ्यासकांनी परिश्रमपूर्वक घेतलेला आहे.

आपल्या दैनंदिन जीवनात आणि कलाजीवनात या संस्कृतीचे धागे कसे एकमेकांमध्ये गुंततात, याचा मागोवा गमतीदार आहे आणि गंभीरही. म्हटलं तर ते गुंतणं सहज, स्वाभाविक असं पण त्यामुळेच चटकन लक्षात न येणारं. आपण वाचणाऱ्या जातीचे बहुतेक लोक

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

अभिजात किंवा शिष्ट साहित्याच्या संस्कारांत मोठे होतो. आपल्या अभिरुचीची घडणही शिष्ट साहित्याच्या हातांनीच होत जाते. लोकपरंपरेच्या मातीनं मळलेल्या हातांचा स्पर्श आपल्याला सहजी होत नाही. कित्येक वेळा तर 'अभिजात' या संज्ञेचा 'लोक' या संज्ञेच्या संदर्भात वापर करताना एक प्रकारचा तर तमभाव आपल्या मनात असतो.

'अभिजात' या संज्ञेचा कोशगत अर्थदेखील 'कुलीन', 'उच्च', 'पंडित', 'विदग्ध' अशा प्रकारचा आहे. त्या तुलनेत 'लोक' ही संज्ञा 'जन' या बोड्या गौण स्वरूपातच येते. खरं पाहिलं, तर लोक आणि अभिजात यांच्या उत्तम अभिसरणावरच त्या त्या समाजाचा सांस्कृतिक विकास अवलंबून असतो, या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करता येत नाही. प्रमाण भाषा आणि बोली भाषा यांच्या संबंधात लागू होणारी भाषावैज्ञानिक सत्यं लोक आणि अभिजात यांच्या संदर्भातील सामाजिक सत्यांशी नातं सांगणारी आहेत. बोलीकडून प्रमाण भाषेला जे मिळतं, ते जिवंतपण, लवचीकपण लोकपरंपराही अभिजात परंपरेला देत असते आणि लोकपरंपरेतील कित्येक घटकांचं उन्नयन अभिजात परंपरेकडून होत असतं."१ कोणत्याही भाषेतील लोकसाहित्य हे त्या भाषेचे अभिजात साहित्य म्हणून नोंद घेण्यासाठी महत्त्वाचे आहे. लोकसाहित्यात भारतीय ज्ञान परंपरांचा समावेश लोककलेच्या माध्यमातून साहित्यात दिसते.

## II. निष्कर्ष

भारतीय ज्ञान परंपरांचे लोकसाहित्याच्या माध्यमातून जतन आणि प्रसार केला आहे. भारतातील विविध प्रदेशांमध्ये असंख्य लोकभाषा अस्तित्वात आहेत. या लोकभाषांमधूनच समाजाचे सामूहिक ज्ञान, परंपरा, मूल्ये आणि तत्त्वज्ञान व्यक्त होते. लोकभाषेतील ज्ञानपरंपरा ही औपचारिक शिक्षण व्यवस्थेपेक्षा वेगळी असली तरी ती तितकीच महत्त्वाची आहे. लोकसाहित्याने समाजात नैतिक आणि बौद्धिक क्षमता विकसित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली दिसते. आधुनिक साधनांच्या माध्यमातून लोकसाहित्याचा हा वारसा जतन करण्याची गरज आहे, जेणेकरून भावी पिढ्या या समृद्ध परंपरेतून ज्ञान मिळवून लाभ घेऊ शकतील.

## संदर्भ ग्रंथ

१. ढेरे अरूणा, "लोक आणि अभिजात", पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१९. पृ. क्र. ६ व ७.
२. व्यवहारे शरद, "लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप" कैलास पब्लिकेशन', औरंगाबाद, १९९९.
३. डॉ. अनिल सहस्रबुद्धे, "लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य भारतीय संकल्पना आणि परंपरा".
४. मांडे प्रभाकर, "लोकसाहित्याचे स्वरूप", सविता प्रकाशन, औरंगाबाद, १९८९.
५. राष्ट्रीय शिक्षण धोरण -२०२०.
६. कन्नोर सतीलाल, पाटील, "प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा", २०२४, अर्थव पब्लिकेशन, धुळे.
७. वाघ शैलेशकुमार, सोनवणे सिद्धार्थ, "भारतीय ज्ञान प्रणाली", २०२४, अथर्व पब्लिकेशन, धुळे.
८. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२३.